**नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन आस्थापनेवरील पदांसाठी परिवहन उपक्रम सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१९ मध्ये अंशत: सुधारणा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- नमुंम-१२२४/ प्र.क्र.१२१ / नवि-२८**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक :- २४ एप्रिल, २०२६**

**वाचा** :- १) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.नमुंम-१२१८/ प्र.क्र.१४२ (२)/ नवि-२८,दि.११.०७.२०१९
२) परिवहन व्यवस्थापक, नवी-मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र. नमुंमपा/परि/प्रशा/६६२/२०२५, दि.०७.०७.२०२५
३) नवी-मुंबई महानगरपालिका प्रशासकीय ठराव क्र. ७२१५, दि.१४.१०.२०२४
४) आयुक्त, नवी-मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र.नमुंमपा/परि/प्रशा/१३६९/२०२४, दि.२९.११.२०२४

**प्रस्तावना :-**

नवी-मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१९, नियमांस दि.११.०७.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर सेवाप्रवेश नियमात नवी-मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील परिवहन विभागातील पदांकरीता नेमणूकीसाठी शैक्षणिक अर्हता व पात्रता विहीत करण्यात आलेली आहे.

**२.** नवी-मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची शैक्षणिक अर्हता शिथील करण्यात यावी व आवश्यक व्यपगत पदे पुनर्विजिवित करण्यात यावीत अशी मागणी परिवहन उपक्रमातील मान्यताप्राप्त कामगार संघटना तसेच, उपक्रमात कार्यरत इतर विविध कामगार संघटना व अधिकारी / कर्मचारी यांचेकडून वारंवार करण्यात येत होती. परिवहन विभागातील काही पदांसाठी नवी-मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१९ मध्ये अंशत: सुधारणा करण्याबाबत, आयुक्त, नवी-मुंबई महानगरपालिका यांनी संदर्भीय दि.२९.११.२०२४ च्या पत्रान्वये प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी सादर केला आहे.

नवी-मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन विभागातील आस्थापनेवर, नवी-मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१९ मध्ये, परिवहन विभागातील विविध पदांकरिता शैक्षणिक अर्हता, भरती प्रमाण/नेमणूकीची पध्दतीसंदर्भात सेवा प्रवेश नियमात तरतूद करण्यात आलेली आहे. तथापि, महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध होत नसल्याने, परिवहन विभागातील काही पदांच्या नेमणूक अर्हतेत सुधारणा करणे गरजेचे आहे. यास्तव, महानगरपालिकेच्या सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१९ मधील तरतूदी पाहता, संदर्भीय दि.११.०७.२०१९ च्या शासन निर्णयासोबतच्या "परिशिष्ट-२" मधील क्र. १५, १६, १७, १८,२६ व ४० मध्ये नमूद संवर्गाच्या अर्हता व नेमणूकीच्या पध्दतीसंदर्भात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**<u>शासन निर्णय</u>:-**

संदर्भीय दि.११.०७.२०१९ च्या शासन निर्णयासोबतच्या "परिशिष्ट-२" मधील क्र. १५, १६, १७, १८,२६ व ४० मध्ये नमूद संवर्गाच्या अर्हता व नेमणूकीच्या पध्दतीत, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ४५४, ४५५ व ४६५(१)(ल) अन्वये प्राप्त अधिकारात, नवी-मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१९ मध्ये अंशत: सुधारणा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. परिवहन विभागातील विविध पदांकरिता शैक्षणिक अर्हतेत व पात्रतेत सोबत जोडलेल्या "परिशिष्ट-२, अनुसूची-अ" अन्वये सुधारणेस मंजूरी देण्यात येत आहे.

**२.** या नियमास "नवी मुंबई महानगरपालिका परिवहन सेवा (सुधारित सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२६" असे संबोधण्यात यावे.

**३.** सदर सुधारित नियम, आयुक्त, नवी-मुंबई महानगरपालिका यांनी तात्काळ शासन राजपत्रात प्रसिध्द करावेत. हे नियम शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

**४.** या आदेशानुषंगिक सर्व संविधानिक बाबींची पूर्तता आयुक्त, नवी-मुंबई महानगरपालिका यांनी करावयाची आहे.

**५.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या <u>www.maharashtra.gov.in</u> या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०४२४१८०९३१९७२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUSHILA DHONDIRAM PAWAR

Digitally signed by SUSHILA DHONDIRAM PAWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=be0660f27b88fa30c14d66b8296a2c28478562c6fd9d1d360094fe11409501d5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2D78E8AB53FB3619E69D852CE1492593ABC1DCE1DF4E081AFE790194FB65C97B, cn=SUSHILA DHONDIRAM PAWAR
Date: 2026.04.24 18:10:39 +05'30'

**( सुशिला पवार )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) आयुक्त, नवी-मुंबई महानगरपालिका, जिल्हा ठाणे.
५) अपर मुख्य सचिव (नवि-२) यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) उप सचिव (नवि-२८), यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) निवडनस्ती (नवि-२८)

**शासन निर्णय क्रमांक :- नमुंम-१२१८/प्र.क्र.१४२ (२)/ नवि-२८ सोबतचे "परिशिष्ट-२, अनुसूची-अ"**

| अ.क्र. | पदनाम व श्रेणी | नवी-मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१९ | टक्केवारी | नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दतीत सुधारणा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ३ | ५ |
| १५ | कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) (श्रेणी-१, अभियांत्रिकी सेवा) | नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या आस्थापनेवरील उप अभियंता (यांत्रिकी या पदावर किमान ३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या व मान्यताप्राप्त विद्यापीठाची मेकॅनिकज अभियांत्रिकी शाखेची पदवी धारण केलेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. | पदोन्नती-१००% | नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या आस्थापनेवरील उप अभियंता (यांत्रिकी या पदावर किमान ३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या व मान्यताप्राप्त विद्यापीठाची मेकॅनिकज अभियांत्रिकी शाखेची पदवी धारण केलेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.<br>उप अभियंता यांची ५ पदे रिक्त असून पदवी धारण करणारे अधिकारी उपलब्ध नसल्यास ६ वर्षे उपअभियंता पदावर सेवा पुर्ण झालेल्या पदविका धारकांचा विचार करता येईल. |
| १६ | उप अभियंता (यांत्रिकी) (श्रेणी-१, अभियांत्रिकी सेवा) | नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या आस्थापनेवरील शाखा अभियंता (यांत्रिकी) या पदावर किमान ३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. | पदोन्नती-१००% | नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) या पदावर किमान ३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| १७ | शाखा अभियंता (यांत्रिकी) (श्रेणी-२, अभियांत्रिकी सेवा) | नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) या पदावर किमान ३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. | पदोन्नती - १००% | नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या आस्थापनेवर शाखा अभियंता (यांत्रिकी) संवर्गाची ०२ पदे मंजूर असून, त्यापैकी ०१ पद कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) मध्ये समायोजित करण्यात व ०१ पद व्यपगत करण्यात येत आहे. |
| १८ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) (श्रेणी-३, तांत्रिक सेवा) | अ) मान्यताप्राप्त यांत्रिकी (Mechanical Engineering) अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>ब) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | नामनिर्देशन / सरळसेवा-१००% | सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१९ मध्ये कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) या पदाचे नेमणूक पध्दत ही १००% नामनिर्देशन/सरळसेवा अशी आहे. आता महानगरपालिकेने सदर पदासाठी नेमणूक पध्दतीमध्ये बदल प्रस्तावित केला असून, त्याप्रमाणे त्यांची मागणी परिवहन सेवेतील प्रमुख मॅकेनिक, मॅकेनिक दर्जा-१, मॅकेनिक दर्जा-२ या पदांकरीता पदोन्नती संधी उपलब्ध होण्याकरिता महानगरपालिकेने प्रस्तावित केल्याप्रमाणे नामनिर्देशन/ सरळसेवा- ५०% व पदोन्नती-५०% असे बदल करण्यात येत आहे. |

SUSHILA DHONDIRAM PAWAR

Digitally signed by SUSHILA DHONDIRAM PAWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=be0660f27b88fa30c14d66b8296a2c28478562c6fd9d1d360094fe11409501d5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2D78E8AB53FB3619E69D852CE1492593ABC1DCE1DF4E081AFE790194FB65C97B, cn=SUSHILA DHONDIRAM PAWAR
Date: 2026.04.24 18:11:03 +05'30'

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | (नमुंमपामध्ये यापूर्वी कनिष्ठ अभियंता [यांत्रिकी] या संवर्गाची २ पदे मंजूर + १ पद शाखा अभियंता [यांत्रिकी] संवर्गातून समावेश) |
| २६ | मेकॅनिक दर्जा-१ (श्रेणी-३, तांत्रिक सेवा) | नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या आस्थापनेवरील मोटर मेकॅनिक (दर्जा-२) या पदावर किमान ३ वर्षांची सेवा पूर्ण झालेल्या व आय.टी.आय. चा मोटर मेकॅनिकल (व्हेईकल)/ डिझेल मेकॅनिक/ऑटो इलेक्ट्रीशियन अभ्यासक्रम पूर्ण व तद्नंतर एन.सी.टी. व्ही.टी. चे प्रमाणपत्र असलेल्या कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. | नामनिर्देशन / सरळसेवा- २५%<br><br>पदोन्नती- ७५% | **नामनिर्देशन / सरळसेवा- २५%**<br>अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीद्य (S.S.C.) उत्तीर्ण.<br>ब) आय.टी.आय. चा मोटर मेकॅनिकल (व्हेईकल)/ डिझेल मेकॅनिक/ऑटो इलेक्ट्रीशियन अभ्यासक्रम पूर्ण.<br>क) वैध जड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक.<br>ड) जड वाहन दुरूस्तीचा किमान २ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>**पदोन्नती- ७५%**<br>नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या आस्थापनेवरील मेकॅनिक दर्जा-१ या पदावर पदोन्नती देणेकरिता शैक्षणिक अर्हतेत बदल न करता, नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१९ मधील मेकॅनिक दर्जा-१ या पदासाठीची तरतूद कायम ठेवण्यात येत आहे. |
| ४० | संगणक अधीक्षक/ प्रक्रीया नियोजक (श्रेणी-१, वाहतूक व्यवस्थापक सेवा) | अ) संगणक विषयासह बी.ई./बी.टेक/ एम.सी.ए. पदवी<br>ब) प्रोग्रामिंग/ सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट मधील किमान २ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | नामनिर्देशन / सरळसेवा- १००% | संगणक अधीक्षक/प्रक्रीया नियोजक (श्रेणी-१, वाहतूक व्यवस्थापक सेवा) या पदनामाऐवजी कनिष्ठ अभियंता, असे पदनाम करणे तसेच, एस-२०, ५६१००-१७७५०० ऐवजी एस-१४, ३८६००-१२२८०० याप्रमाणे वेतनश्रेणीत बदल करण्यात येत आहे. |

********

SUSHILA DHONDIRAM PAWAR

Digitally signed by SUSHILA DHONDIRAM PAWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=be0660f27b88fa30c14d66b8296a2c28478562c6fd9d1d360094fe11409501d5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2D78E8AB53FB3619E69D852CE1492593ABC1DCE1DF4E081AFE790194FB65C97B, cn=SUSHILA DHONDIRAM PAWAR
Date: 2026.04.24 18:11:21 +05'30'